दावा दाखल तारीख ०९/०६/२०२६

दावा फैल तारीख ०९/०६/२०६६

दावा निकाल तारीख ०२/०७/२०२६

# तडजोड हुकूमनामा

रे.क.नं.६४/२०२६

नि.नं. १२/A

## कुरूंदवाड येथील मे.सह दि.न्या.क.स्तर सो यांचे कोर्टात

**संतोष बाळासो पाटील** व.व.४२, धंदा.शेती
रा.अ.लाट, ता.शिरोळ जि.कोल्हापूर } वादी

विरूध्द

१)**अन्नपूर्णा आण्णासो पाटील** व.व.३५, धंदा.शेती,
रा.अ.लाट, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

२)**शिवराज आण्णासो पाटील** व.व.१७ अज्ञान
सबब अ.पा.क.आई प्रतिवादी नं.१
अन्नपूर्णा आण्णासो पाटील व.व.३५, धंदा.शेती,
रा.अ.लाट, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

३)**वैभवी आण्णासो पाटील** व.व.१५ अज्ञान
सबब अ.पा.क.आई प्रतिवादी नं.१ } प्रतिवादी

अन्नपूर्णा आण्णासो पाटील व.व.३५, धंदा.शेती,

रा.अ.लाट, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

४)**अदिराज आण्णासो पाटील** व.व.१२ अज्ञान

सबब अ.पा.क.आई प्रतिवादी नं.१

अन्नपूर्णा आण्णासो पाटील व.व.३५, धंदा.शेती,

रा.अ.लाट, ता.शिरोळ जि.कोल्हापूर

५)**राजश्री आनंदा आडके** व.व.५४,धंदा घरकाम

रा.नांदणी ता.शिरोळ जि.कोल्हापूर

६)**भाग्यश्री सदाशिव पाटील** व.व.४३ धंदा घरकाम

रा.राजापूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर **प्रतिवादी**

७)**शांताबाई बाळासो पाटील** व.व.७७ धंदा घरकाम

रा.अ.लाट ता.शिरोळ जि.कोल्हापूर

८)**राजश्री नानासाहेब खोत(देसाई)** व.व.५१ धंदा घरकाम

रा.शिवापूरवाडी ता.चिक्कोडी जि.बेळगांव

९)**विजयश्री संजय देसाई** व.व.४८ धंदा घरकाम

रा.रांगोळी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

दावा हक्कज्ञापनाचा

<u>दावा रू.३३२.00/-</u>

**<u>यातील वादीचा दावा असा की,</u>**

१) <u>दावा मिळकतींचे वर्णन</u> ः- अ)जि.कोल्हापूर,ता.शिरोळपैकी मौजे **अ.लाट** गावचे हददीतील **गट नं.१५६५** , एकूण क्षेत्र हे.0.५३.00 आर. याचा आकार रू.४.३१ पै.**यापैकी क्षेत्र हे.0.२६.५0 आर.आकार रू.२.१५ पै.**ची मिळकत.

ब)जि.कोल्हापूर,ता.शिरोळपैकी मौजे **अ.लाट** गावचे हददीतील **गट नं.२0६५** , एकूण क्षेत्र हे.0.८२.00 आर.(पो.ख.क्षेत्र हे.0.0९.00 आर.) याचा आकार रू.६.३६ पै.**यापैकी हे.0.२३.00 आर.याचा आकार रू.२.00 पै.**ची मिळकत.

येणेप्रमाणे मिळकती तंदगभुत वस्तूसह यास यापुढे **दावा मिळकत** असे संबोधले आहे.

२) वादी , प्रतिवादी यांचे नातेसंबंध समजणेसाठी वंशावळ खालीलप्रमाणे -

बाळासो पाटील(मयत)

= शांताबाई(प्र.वादी ७)

आण्णासो
संतोष राजश्री
भाग्यश्री

राजश्री विजयश्री

= अन्नपूर्णा (वादी) (प्र.वादी ५) (प्र.वादी ६) (प्र.वादी ८) (प्र.वादी ९)
(प्र.वादी १)

शिवराज वैभवी अदिराज

(प्र.वादी २) (प्र.वादी ३) (प्र.वादी ४)

वादी प्रतिवादी यांचे मुळ पुरूष बाळासो म्हादगोंडा पाटील हे होत. बाळासो म्हादगोंडा पाटील हे मयत असून त्यांना पत्नी शांताबाई.सदर बाळासो व शांताबाई यांना मुले आण्णासो व संतोष दोन मुले व राजश्री ,भाग्यश्री राजश्री, विजयश्री या मुली होय.आण्णासो हे मयत असुन त्यांना वारस पत्नी अन्नपूर्णा मुले शिवराज ,वैभवी व अदिराज हे होय.

३) वादी ,प्रतिवादी यांचे पूर्वी पासून एकत्र कुटूंब आहे.दावा मिळकत ही वादी ,प्रतिवादी यांची वडीलार्जीत एकत्र कुटूंबाची मिळकती होय. वादी ,प्रतिवादी यांचेत एकत्र कुटूंबाचे मिळकतीवरून किरकोळ कारणावरून गेल्या दोन,तीन वर्षापासुन कौटूंबिक कुरबुर व मतभेद चालू होते.सदरची कुरबुर व मतभेद मिटावेत वाद विकोपाला जाऊ नयेत व वादी ,प्रतिवादीचे असलेने संबध सलोख्याचे रहावेत या सद हेतूने वादी ,प्रतिवादी यांनी पंच व नातेवाईक यांच्या मध्यस्थीने ता.१९.०३.२०२६ इ.रोजी चे चैत्र गुढीपाडव्याचे दिवशी दावा मिळकतीचे तोंडी वाटप करून घेतले.

४)सदर तोंडी वाटपात दावा अर्ज कलम **१(अ) गट नं.१५६५** क्षेत्र **हे.०.२६.५० आर.** ची मिळकत **वादी** यांचे हिस्सेस मालकी हक्काने देणेत आली .

तसेच दावा अर्ज कलम **१(ब) गट नं.२०६५** क्षेत्र **हे.०.२३.00 आर.**ची मिळकत **प्रतिवादी नं.१ ते प्रतिवादी** ४ यांना मालकी हक्काने देणेत आली.

प्रतिवादी नं.५ ते ९ यांचे आहेर माहेर व लग्नखर्च ,सेवा सुश्रृषा हे एकत्र कुटूंबाचे उत्तपन्नातुन केलेला असलेने त्यांनी कोणताही हिस्सा दावा मिळकतींन मध्ये घेतलेला नाही त्यांनी आपला हिस्सा विना मोबदला सोडून दिलेला आहे.सदर झाले वाटपाप्रमाणे ता.१९.०३.२०२६ इ.रोजी चे चैत्र गुढीपाडव्यापासून वादी हे वर कलम ४ यात वर्णन केलेप्रमाणे आपले हिस्सेस आले मिळकतीमध्ये मालक नात्याने स्वतंत्रपणे उपभोगत होते व आहेत.

५)वरील प्रमाणे वस्तूस्थिती असुन वादी यांची सदर वाटपाप्रमाणे दावा मिळकतीत मालक नात्याने शांततामय कब्जे वहिवाट सुरू असताना यातील प्रतिवादी यांनी ता.१५.०४.२०२६ इ.रोजी दावा मिळकतीत येवून वादींची मालकी नाकारली व पून्हा संपूर्ण दावा मिळकतीत हक्क सांगणेचा प्रयत्न सुरू केलेने वादींना सदरचा दावा मे. कोर्ट मजकूरी दाखल करणे भाग पडले आहे.

६ )<u>**दावेस कारण**</u> - यातील प्रतिवादी यांनी ता.१५.०४.२०२६ इ.रोजी दावा मिळकतीत येवून वादीची मालकी नाकारली व पून्हा संपूर्ण दावा मिळकतीत हक्क सांगणेचा प्रयत्न सुरू केला तेव्हा दावेस कारण घडले व सतत घडत आहे.

७)<u>दावेचा तपशील</u>

| रू. पै. | |
|---|---|
| ३३२.00 | दावा अर्ज कालम १(अ)व १(ब)मध्ये वर्णन केलेल्या मिळकतींचा एकुन आकार रू.४.१५ पै.याचे ८0 पटीवर आकारणी केली आहे. |

---

३३२.00 एकूण दावा रूपये.

८)कोर्ट फी ,वकील फी साठी दावेची आकारणी र.रू. ३३२.00/- वर केली आहे व ज्यूडीसाठी आकारणी रू.३३२.00/- वर केली आहे.त्यावर बॉम्बे कोर्ट फी स्टॅम्प ॲक्ट कलम ६(४)(ड) प्रमाणे कोर्ट फी लावली आहे.

९) वादी,प्रतिवादी व दावा मिळकती या मे. कोर्टाच्या स्थळसिमेतील असल्यामुळे सदरचा दावा मे.कोर्ट मजकूरी चालणेस पात्र आहे.

१0)दावेस कारण घडलेपासून सदरचा दावा मुदतीत दाखल केलेला आहे.

११)**<u>सबब वादीची विंनती की -</u>**

अ) वादी हे दावा अर्ज कलम ४ मध्ये नमूद केलेप्रमाणे दावा मिळकतीचे मालक असल्याचे हक्कज्ञापन होवून मिळावे.

ब) इतर न्यायाचे अनुषंगिक हूकूम याचकामी वादीचे वतीने व्हावेत.

क)जरूर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे असे.

हा दावा आज दि.0२ माहे 0७ सन २0२६ इ.रोजी श्रीमती व्ही.आर.माने सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कुरूंदवाड यांचेकडील हा दावा मध्यस्थ न्यायाधिश श्री.बी.एस.गायकवाड दि.न्या.क.स्तर कुरूंदवाड यांचे समोर

वादीतर्फे ॲड.एस.डी.पाटील व प्रतिवादीतर्फे ॲड.व्ही.आर.चौगुले यांचेसमक्ष वादी व प्रतिवादी यांचेत नि.११/बी प्रमाणे आपसात तडजोड झाले ते खालीलप्रमाणे-

१)वादीचा दावा प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

२)वादी ,प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब आहे.दावा मिळकत ही वादी ,प्रतिवादी यांची वडीलार्जीत एकत्र कुटूंबाची मिळकती होय. वादी ,प्रतिवादी यांनी पंच व नातेवाईक यांच्या मध्यस्थीने ता.१९.०३.२०२६ इ.रोजी चे चैत्र गुढीपाडव्याचे दिवशी दावा मिळकतीचे खालीलप्रमाणे तोंडी वाटप करून घेतले.

३)सदर तोंडी वाटपात दावा अर्ज कलम **१(अ) गट नं.१५६५** क्षेत्र **हे.०.२६.५० आर.** ची मिळकत **वादी श्री.संतोष बाळासो पाटील** यांचे हिस्सेस मालकी हक्काने देणेत आली .

४)सदर तोंडी वाटपात दावा अर्ज कलम **१(ब) गट नं.२०६५** क्षेत्र **हे.०.२३.०० आर.**ची मिळकत **प्रतिवादी नं.१ अन्नपूर्णा आण्णासो पाटील** , प्रतिवादी नं.२ **शिवराज आण्णासो पाटील** ,प्रतिवादी नं.३ **वैभवी आण्णासो पाटील** व प्रतिवादी नं.४ **अदिराज आण्णासो पाटील** यांना मालकी हक्काने देणेत आली.

५)प्रतिवादी नं.५ ते ९ यांचे आहेर माहेर व लग्नखर्च ,सेवा सुश्रृषा हे एकत्र कुटूंबाचे उत्पन्नातुन केलेला असलेने त्यांनी कोणताही हिस्सा दावा मिळकतींन मध्ये घेतलेला नाही त्यांनी आपला हिस्सा सदर वाटपात विना मोबदला सोडून दिलेला आहे.

६)सदर झाले वाटपाप्रमाणे ता.१९.०३.२०२६ इ.रोजी चे चैत्र गुढीपाडव्यापासून वादी व प्रतिवादी नं.१ ते ४ हे वर नमुद केले तपशिलाप्रमाणे आपले हिस्सेस आले मिळकतीमध्ये मालक नात्याने स्वतंत्रपणे उपभोगत होते व आहेत.असे हक्कज्ञापन करणेत येत आहे.

७) वर नमुद केले तपशीलाप्रमांण दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादी ,प्रतिवादी नं.१ ते ४ यांची नावे संबधीत महसूल खात्यामार्फत विनातकार तात्काळ नमुद करण्याचे असुन त्यास वादी ,प्रतिवादी यांनी आवश्यक सही , संमत्ती देणेची आहे .

८)कोर्ट खर्च ज्याचा त्यांनी सोसणेचा आहे.

**Order below Exhibit 1.**

Plaintiff, defendants and their respective Advocates are

present before Court today. On mutual consent of the parties, this matter was referred for mediation. Accordingly, Ld. Mediator Judge has filed Mediation Report (Exh.10) along-with the Compromise pursis (Exh.11) filed by both parties. As per Mediation Report, dispute between the parties has been amicably settled in accordance with the terms of pursis.

02. Plaintiff and defendants are duly verified as to contents of said pursis to which they stated to be true and correct. Both parties are identified by their respective Advocates. The voluntariness of both parties is ascertained.

03. Therefore, on satisfaction of the voluntariness of both parties and in view of Mediation Report, the suit is disposed of as compromised in accordance with the terms of settlement. Compromise Decree shall be drawn up accordingly. The Compromise pursis shall form the part of said compromise decree.

04. As this matter is settled by adopting ADR mechanism, hence, plaintiff is entitled for refund of Court Fees as per rules.

Proceeding is closed accordingly.

sd-

Date : 02/07/2026. (V. R. Mane )

Place : Kurundwad. Jt. Civil Judge Jr. Dn., Kurundwad.

निशान नं.१२/ए सोबत

रे.दि.मु.नं.६४/२०२६

- खर्चाचा आकडा -

| अ. नं. | तपशील | वादी रूपये - पैसे | प्रतिवादी रूपये - पैसे |
|---|---|---|---|
| १ | दाखल दाव्यास स्टॅम्प | २००.०० | - |
| २ | वकीलपत्रास स्टॅम्प | १०.०० | १०.०० |
| ३ | दाखल कगदापत्रास स्टॅम्प | १०.०० | - |
| ४ | वकील फी | १५०.०० | १५०.०० |
| ५ | आदेशिका फी | - | - |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | - | - |
| | एकूण - | ३७०.०० | १६०.०० |
| | न दिलेला खर्च | - | - |
| ७ | मुदत अर्जावरील स्टॅम्प | - | - |
| ८ | रिफंड ३/४ | - | - |
| | एकुण- | ३७०.०० | १६०.०० |

आज दिनांक ०२, माहे जुलै, सन २०२६ इ.रोजी आमचे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिला.

CIVIL JUDGE OF KURUNDWAD

VRmane 2.7.2026

(श्रीमती व्ही.आर.माने)

क.लिपिक

सह.दिवाणीन्यायाधिश,कनिष्ठ स्तर कुरूंदवाड

वादी तर्फे - ॲड.एस.डी.पाटील Adv. S.D.Patil

प्रतिवादीतर्फे - ॲड.व्ही.आर.चौगुले

---

टिप ः-हया मुकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की,त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झालेवर ते नाश करून टाकण्यास पात्र होतील.